गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक १४५ | गुरुवार २५ मे २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 145 | Date : 25/05/2023 | blow :Thursday | Page 4 | Price 4

## आज बारावीचा निकाल

पुणे : राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च – एप्रिल २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल आज(गुरुवार) दुपारी २ वाजता ऑनलाइन जाहीर होणार असल्याची घोषणा राज्य मंडळाच्यावतीने करण्यात आली आहे. त्यामुळे मागील काही दिवसांपासून असलेली निकालाची प्रतीक्षा संपली आहे. पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय शिक्षण मंडळांमार्फत परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण मंडळाच्या संकेतस्थळांवर आज(गुरुवार) दुपारी २ नंतर उपलब्ध होतील.

अधिकृत संकेतस्थळ पुढीलप्रमाणे –

1. mahresult.nic.in
2. https://hsc.mahresults.org.in
3. http://hscresult.mkcl.org
4. https://hindi.news18.com/news/career/board-results-maharashtra-board
5. https://www.indiatoday.in/education-today/maharashtra-board-class-12th result-2023
6. http://mh12.abpmajha.com

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण वरील संकेतस्थळांवरुन उपलब्ध होतील व सदर माहितीची प्रत (प्रिंट आउट) घेता येईल. www.mahresult.nic.in या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या निकालाबाबतची इतर सांख्यिकीय माहिती उपलब्ध होईल. तसेच www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर कनिष्ठ महाविद्यालयांना एकत्रित निकाल उपलब्ध होईल.

# शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँकांविरोधात गुन्हा दाखल करणार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा इशारा

मुंबई : शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँकांविरोधात कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिला आहे, तर शेतकऱ्यांच्या सिबील स्कोरचा बाऊ करणाऱ्या बँकांवर एफआयआर दाखल करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिले आहेत. राज्य सरकारची खरीप हंगाम पूर्वतयारी आढावा बैठक मुंबईतल्या यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये बुधवारी पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषीमंत्र्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. बोगस खतं आणि बियाणं विकणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री शिंदे यांनी दिला आहे. शेतकऱ्यांच्या सिबिल स्कोअरचा बाऊ करुन, कर्ज नाकारणाऱ्या बँकाना धडा शिकवा असे आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बैठकीत दिले आहेत. राज्य सरकारच्या भूमिकेला मानत नाही, अशा बँकांना झटका द्यावाच लागेल आणि त्यासाठी एक तरी एफआयआर केला पाहिजे अशा शब्दांत फडणवीसांनी आपला संताप व्यक्त केला.



शेतकऱ्यांसाठी खतं आणि बियाणांची तजवीज करण्यात आली असून, शेतकऱ्यांनी पावसाचा अंदाज घेऊनच पेरणी करावी असा सल्ला त्यांना देण्यात आला आहे. शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँकांविरोधात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चांगलेच आक्रमक झालेत. कर्ज देताना शेतकऱ्यांचा अडवणूक झाली किंवा शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केल्यास, अशा बँकांविरोधात थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश फडणवीसांनी दिलेत. त्याचसोबत, बँकांनी सरकारचे आदेश मानले नाहीत तर, त्यांना झटका द्यावाच लागेल, असा कडक इशाराच फडणवीसांनी दिलाय. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बँकांच्या भूमिकेवर । पान २ वर

## संसदेच्या नव्या इमारतीच्या उद्घाटनावर १९ पक्षांचा बहिष्कार तर सरकारकडून जोरदार तयारी

नवी दिल्ली : संसदेच्या नव्या इमारतीचं उद्घाटन होतं आहे आणि देशातल्या १९ विरोधी पक्षांनी त्यावर बहिष्कार टाकला आहे. काँग्रेससह महाराष्ट्रातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचाही त्यात समावेश आहे. राष्ट्रपतींना या कार्यक्रमातून बेदखल करणं हा लोकशाहीचा अपमान आहे अशी भूमिका घेत सर्वपक्षीयांनी एकत्रित निषेधपत्र जाहीर केलं आहे.

दुसरीकडे सरकार मात्र २८ मे च्या कार्यक्रमासाठी जोरदार तयारीला लागलं आहे. संसद उद्घाटनाच्या कार्यक्रमाची माहिती देतानाच केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांनी विरोधकांच्या बहिष्काराबाबतही उत्तर दिलं.

दक्षिणेतल्या ऐतिहासिक चोल साम्राज्याचा राजदंडही नव्या संसदेत स्थापित केला जाणार असल्याची माहिती अमित शाहांनी दिली आहे.

**संसदेच्या उद्घाटनावर १९ पक्षांचा बहिष्कार**

– ज्या हुकुमशाही पद्धतीनं नव्या संसदेची निर्मिती केली जातेय, याबद्दल आमचे काही आक्षेप असूनही ते बाजूला ठेवत या उद्घाटन कार्यक्रमाला राहायला आम्हाला आवडलं असतं.


– पण या कार्यक्रमातून राष्ट्रपतींनाच बेदखल केलं जातंय, हा लोकशाहीचा अपमान आहे

– घटनेनुसार राष्ट्रपती आणि दोन्ही सभागृहं मिळून संसद बनत असते. राष्ट्रपतींच्या सहीनंच संसदेचा कायदा मंजूर होत असतो

– महिला आदिवासी राष्ट्रपती बनण्याची सर्वसमावेशक प्रकिया ज्या लोकशाहीने घडवून आणली त्याचाही अनादर होत आहे.

## ऑस्ट्रेलियातील हिंदू मंदिरांसह धार्मिक स्थळांवर होणारे हल्ले भविष्यात सहन करणार नाही, मोदींना आश्वासन

सिडनी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज ऑस्ट्रेलियातील हिंदू मंदिरांवर झालेल्या हल्ल्यांचा मुद्दा उपस्थित केला आणि त्यावर ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी भविष्यात हिंदू मंदिरांसह धार्मिक स्थळांवर होणारे हल्ले ऑस्ट्रेलिया सहन करणार नाही. अशा घटकांवर कडक कारवाई करू, असे आश्वासन दिल्याचे मोदी यांनी म्हटले आहे. मोदी यांनी बुधवारी सिडनी येथे अँथनी अल्बानीज यांच्याशी या मुद्द्यावर द्विपक्षीय चर्चा केली. आज ते सिडनी येथे भेट देण्यापूर्वी सिडनी हार्बर आणि ऑपेरा हाऊस तिरंग्याने उजळला होता.



अल्बानीज यांच्यासोबत संयुक्त निवेदन सादर करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, पंतप्रधान अँथनी अल्बानीज आणि मी ऑस्ट्रेलियातील मंदिरांवर झालेले हल्ले आणि फुटीरतावादी घटकांच्या कारवायांवर यापूर्वीही चर्चा केली होती. आम्ही आजही या विषयावर चर्चा केली. भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यानचे द्विपक्षीय संबंध मैत्रीपूर्ण आहेत. या संबंधांना बाधा पोहोचवणारी काही घटकांची कृती आम्ही सहन करणार नाही. पंतप्रधान अल्बानीज यांनी आज पुन्हा एकदा आश्वासन दिले की ते भविष्यातही अशा घटकांवर कठोर कारवाई करतील. ऑस्ट्रेलियाच्या अनेक भागांमध्ये अलीकडेच खलिस्तानी समर्थक आणि भारत समर्थक निदर्शकांमधील संघर्षाची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. ऑस्ट्रेलियात नुकत्याच भारतीय झेंडे जाळण्याचे आणि एका हिंदू मंदिराचीही तोडफोड करण्याच्या घटना घडल्या आहेत.

## अहंकारी, स्वार्थी माणूस देश चालवू शकत नाही, 'मातोश्री'वरुन केजरीवालांचा मोदींवर हल्ला

मुंबई : अध्यादेशाचा निर्णय अहंकारातून आला आहे. अहंकारी आणि स्वार्थी माणूस देश चालवू शकत नाही, दिल्लीच्या लढाईत उद्धव ठाकरेंची साथ मिळाली आहे, अशा शब्दात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केंद्र सरकारवर टीका केली. तर जनतेला जागं करण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत, असं उद्धव ठाकरे म्हणाले. मुंबईतील संयुक्त पत्रकार परिषदेत ते बोलत होते. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी आज मातोश्रीवर जाऊन ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान देखील उपस्थित होते.



या पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, नाती जपण्यासाठी शिवसेना आणि मातोश्री प्रसिद्ध आहे. राजकारणापलिकडे जाऊन आम्ही नाती जपतो. केजरीवाल दुसऱ्यांदा मातोश्रीवर आले आहेत. दिल्लीसाठी सुप्रीम कोर्टाने दिलेला निर्णय लोकशाहीसाठी आवश्यक होता. परंतु केंद्र सरकारने अध्यादेश आणला, ही कसली लोकशाही? कदाचित असेही दिवस येतील की राज्यात निवडणुका न होता केंद्रातच होती. फारतर २०२४ पर्यंत निवडणुका होती. जनतेला जागं करण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत.


यानंतर अरविंद केजरीवाल यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर टीका करतानाच अध्यादेशाची राज्यसभेतील लढाईत उद्धव ठाकरे यांची साथ मिळाल्याचं सांगितलं. आम्ही देखील नाती जपणारे, निभावणारे आहोत. आम्ही आता ठाकरे कुटुंबाचा भाग आहोत. दिल्लीच्या । पान २ वर

## बच्चू कडू यांना मंत्रिपदाचा दर्जा

मुंबई/ नाशिक : राज्यातील मंत्रीमंडळाचा विस्तार नेमका कधी होणार याबाबत अद्यापही सस्पेन्स असताना आमदार बच्चू कडू यांना मात्र दिव्यांग कल्याण विभाग अध्यक्ष म्हणून मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे. दिव्यांगांच्या प्रश्नावर सातत्याने आवाज उठविणारे आणि त्यांच्यासाठी राज्यभर ठिकठिकाणी आंदोलन उभारणाऱ्या बच्चू कडू यांनी नेहमीच दिव्यांगांचे प्रश्न मांडले. दिव्यांगांच्या सन्मानासाठी आणि अधिकारासाठी त्यांचा स्वतंत्र विभाग असावा अशी त्यांची अनेक वर्षांची मागणी होती. शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात त्यांच्या मागणीनुसार दिव्यांग कल्याण विभाग मंत्रालयात स्थापन करण्यात आला. परंतु राज्यातील अस्थिर वातावरणामुळे कोणत्याच मंत्रिपदाबाबत निर्णय होत नव्हता. परंतु आता न्यायालयाच्या निर्णयानंतर मंत्रीमंडळ विस्तारची चर्चा पुन्हा जोर धरू लागली असून मंत्रीमंडळात कुणाची वर्णी लागणार यावर खल सुरू झालेला आहे. मात्र आमदार बच्चू कडू यांच्या नावाचे थेट परिपत्रकच काढण्यात येऊन त्यांना दिव्यांग कल्याण विभागाचा मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे. दिव्यांगासाठी राज्यात ६ जूनपासून विशेष मोहीम राबविली जाणार आहे.

## ज्ञानवापी प्रकरणी सातही याचिकांची एकत्रितपणे ७ जुलैला सुनावणी होणार, वाराणसी कोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय

नवी दिल्ली : ज्ञानवापी खटल्याशी संबंधित सात याचिकांवर एकत्रित सुनावणी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय वाराणसी कोर्टाने घेतला आहे. सातही याचिकांची एकत्रित सुनावणी ७ जुलै रोजी होणार आहे. वाराणसीच्या जिल्हा न्यायाधीशांनी ज्ञानवापीशी संबंधित सात याचिकांवर एकत्र सुनावणी करण्याचे आदेश दिले आहेत.ज्ञानवापी आणि आदि विश्वेश्वर खटल्यांचे विशेष वकील राजेश मिश्रा यांनी सांगितले की, जिल्हा न्यायाधीशांनी आपल्या विशेषाधिकाराचा वापर करून ज्ञानवापी प्रकरणाशी संबंधित एकाच स्वरूपाच्या सात प्रकरणांची एकत्रित सुनावणी करण्याचे आदेश दिले. जिल्हा न्यायाधीशांनी आपल्या आदेशात म्हटले आहे की, ही सर्व प्रकरणे वेगवेगळ्या न्यायालयात प्रलंबित राहिल्यास परस्परविरोधी आदेश निघण्याची। पान २ वर



# दोन दिवसात निर्णय नाही तर एकाही मंत्र्याला रस्त्यावर फिरू देणार नाही : ॲड.विकास जाधव



## सरपंच व शेतकऱ्याच्या विविध मागणीसाठी सरपंच परिषद, रयत क्रांती रस्त्यावर

मुंबई/प्रतिनिधी :सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र रयत क्रांती संघटनेच्या वतीने विविध मागण्यासाठी यशवंतरावजी चव्हाण साहेब यांच्या स्मृती स्थळाचे दर्शन घेऊन सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे,रयत क्रांतीचे सदाभाऊ खोत, ॲड विकास जाधव, राजू पाटील यांच्या नेतृत्वात ३ दिवसापूर्वी कराड ते सातारा पायी मोर्चा सुरूवात झाली. सदर मोर्चात राज्यातील हजारो सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी हजारोंच्या संख्येने उपस्थित झालेले आहेत.सदर मोर्चा तीन टप्प्यात पुढे आलेला असून आज चौथा टप्पा सुरू झालेला आहे तरीही शासनाने ठोस निर्णय घेतलेला नाही

.सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी यांच्या मागण्याकडे सरकार जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. पंचायतराज पदाधिकारी व शेतकरी या घटकाचा अवमान म्हणजे ग्रामीण भागातील मतदारांचा अपमान आहे. त्यामुळे तात्काळ दखल न घेतल्यास ग्रामीण भागातील मतदार

> सरपंच परिषद मुंबईच्या वतीने प्रदेश अध्यक्ष दत्ता काकडे व अँड विकास जाधव यांच्या नेतृत्वाखालील सरपंच व उपसरपंच यांच्या विविध मागणी करिता कराड पासून मोर्चास निघाले असून सदर मोर्चा मध्ये सोलापूर जिल्हासह अक्कलकोट तालुक्यातील सरपंच व उपसरपंच मोठ्या संख्येने उपस्थित व्हावे **–कमलाकर सोनकांबळे,उपसरपंच , गोगांव**

अपमानाचा बदला येत्या निवडणुकीच्या माध्यमातून घेईल असे यावेळी सरपंच परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड विकास जाधव यांनी सांगितले.

कराड ते सातारा पायी मोर्चा व तेथून पुढे वाहनाने थेट मंत्रालयावर धडक असे दोन टप्प्यांमध्ये मोर्चाचे नियोजन केले असून याबाबतीत दहा दिवसापूर्वी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, कृषिमंत्री यांच्यासह सर्व विभागांना निवेदन देऊन कळवलेले होते. मोर्चा सुरू होऊन तिन दिवस झाले आहे,प्रचंड उन्हाचा तडाका आहे,काल वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू होता तरीही हजारो सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी मोर्चात चालत होते. याचा शासनाने विचार केला नाही ही दुर्दैवी बाब आहे शासनाने अधिक विलंब न लावता मोर्चा साताऱ्यात धडके पर्यंत ठोस निर्णय घेऊन मागण्या मान्य न केल्यास सरकारमधील एकाही मंत्र्याला रस्त्यावर फिरणे कठीण होईल. आंदोलन आक्रमक झाल्यास कठीण परिस्थिती निर्माण होईल त्यामुळे सरकारने लवकरात लवकर ठोस निर्णय घ्यावा असे आव्हान यावेळी प्रदेश उपाध्यक्ष विकास जाधव यांनी केले. या मोर्चामध्ये शेकडो महिला सहभागी आहेत, त्या रखरखत्या उन्हात चालत आहेत सरकारला थोडीही दयामाया दिसून येत नाही ही गंभीर बाब आहे असे यावेळी सरपंच परिषदेच्या सोलापूर जिल्हा समन्वयक वनिता सुरवसे यांनी सांगितले, यावेळी सरपंच परिषदेचे प्रसिद्धी प्रमुख संजय जगदाळे प्रदेश सरचिटणीस राजू पोतनीस, आनंद जाधव,सुषमा डेसले, आबासाहेब सोनवणे, अनिल सोनमळे, किसनराव जाधव, विकास माने,कृष्णा काशीद,अभिजीत जाधव,शत्रुघ्न धनवडे,संजय शेलार, साधना चव्हाण, चव्हाण,दिपाली चोरगे, सुषमा देसाई,अनिल सोनमळे,यांच्यासह अनेक पदाधिकारी व सरपंचं बहुसंख्येने उपस्थित होते.

## ✻ सुविचार ✻

शिक्षण म्हणजे मानवाच्या अंगी जे सुप्त पूर्णत्व आहे, त्याचेच प्रकटीकरण होय.- स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### विकासाला प्राधान्य देतील

उन्हाळ्याची मोठी सुटी कधी संपेल याची अनेक पालक चातकासारखी वाट पाहात असतात तर सुटी कधी संपूच नये अशी मुलांची भावना असते. 'रोज रोज शाळा पुरे ती आला कंटाळा, चार दिवस आता मनाला कसली ना चिंता, उडू बागडू जशी पाखरे स्वैर अंतराळी' सुटीचे असे वर्णन कवी माधवानुज यांनी केले आहे. तथापि सुटीतही मुलांनी पुढील इयत्तेचा थोडा तरी अभ्यास सुरु करावा असे अनेक पालकांना वाटते. इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांच्या सुट्या अलीकडच्या काळात कमी झाल्याचे आढळते. तथापि सुटीत केली जाणारी धमालही विद्यार्थ्यांना खूप काही शिकवते. तसेच शाळेतील अभ्यासबाह्य उपक्रमातून विद्यार्थ्यांची सर्वांगीण जडणघडण होते याची आठवण डॉ. मोहन आगाशे यांनी करून दिली आहे. आगाशे संवेदनशील कलाकार आणि मानसतज्ज्ञ आहेत. त्यांचा अनुभवाचा सल्ला पालक समजून घेतील का? पूर्वी मुले सुटीत धमाल खेळ खेळायची. मामाच्या गावाला जायची. मुलींची भातुकली रंगायची. यातूनच मुले अनेक कौशल्ये त्यांच्याही नकळत शिकायची. पाहुणे म्हणून कोणाकडे गेल्यावर कसे वागायचे, ताटात जे पदार्थ वाढले जातील ते सगळे खायचे, आवडनिवड सांगायची नाही, सकाळी लवकर उठायचे, हट्ट करायचा नाही असे अनेक संस्कार मुलांवर व्हायचे. अशा गोष्टी मुलांना वेगळ्या शिकवायची गरज पालकांना कधीही वाटली नसेल. हा वारसा पुढे चालवला जाऊ शकतो असे किती पालकांना वाटते? मुलांना घरगुती कामे शिकवू शकतात. त्यातून श्रमसंस्कार घडेल. कामाचे मोल समजेल. कोणतेही काम कमी अथवा छोटे नसते हे कळेल. यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकेल. सुटीत थोड्या मोठ्या मुलांना बँकेचे व्यवहार समजावले जाऊ शकतील. बँकेतील ग्राहकांच्या रांगेत उभे राहणे संयम शिकवते. आता लगेच हवे या भावनेला आवर कसा घालायचा हे मुलांना कदाचित त्यातून कळेल. गाणे ऐकायचे कसे, वाद्य वाजवायला शिकण्यासाठी रियाज कसा नियमित लागतो, नाटकामुळे संवादाची फेक कशी करायची, अशी अनेक कौशल्ये मुले शिकतील. अनुभवासारखा दुसरा गुरु नाही असा सुविचार मुले शाळेत शिकतात त्याचा व्यापक अर्थ हाच असावा का? अशा अनेक गोष्टी मुलांना शिकवण्यासाठी सुटीसारखी दुसरी संधी पालकांना कदाचित मिळणार नाही. पालकांनी अभ्यासाचा अति बाऊ करू नये असेच मोहन आगाशे यांना सुचवायचे असावे. पालक ते लक्षात घेतील आणि मुलांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देतील, अशी अपेक्षा आहे.

# शासन आपल्या दारी विशेष लेखमालिका

## लेख क्र. ७ दाखले, प्रमाणपत्रे, विविध योजनांचा लाभ महाशिबिराच्या माध्यमातून मिळवा कमीसायास

शासन आपल्या दारी व महाराजस्व अभियानांतर्गत विविध दाखले, लाभाच्या योजना वितरणासाठी जिल्हाभरात आगामी १५ दिवसांत महाशिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या महाशिबिरांमध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक दाखला (महाराष्ट्र राज्य), आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक दाखला (सेंट्रल), विविध प्रकारचे दाखले, सामाजिक सहाय्यता योजना प्रमाणपत्र वितरण आदि सेवा देण्यात येणार आहेत.या योजनांचा लाभ घेण्याठी आवश्यक पात्रता, कागदपत्रे, अर्जपद्धती याबद्दल बऱ्याचदा जनमाणसांत पुरेशी माहिती नसते. अशा महत्त्वाच्या योजनांबाबतची माहिती या लेखात दिली आहे.

उत्पन्न प्रमाणपत्र आवश्यक कागदपत्रे - तलाठी अहवाल व स्वयंघोषणापत्र, आधारकार्डची छायांकित प्रत, रेशनकार्ड, शुभ्र रेशनकार्ड असल्यास आय टी रिटर्न १६ नं.अर्ज जातीचे प्रमाणपत्र आवश्यक कागदपत्रे - शाळा सोडल्याचा दाखला/बोनाफाईट प्रमाणपत्र, रक्तसंबंधित नातेवाईकांचे मानिव दिनांकाचा पुरावा, कुटुंबातील एकाचे जात प्रमाणपत्र असल्यास, स्वयंघोषणापत्र रहिवासी प्रमाणपत्र आवश्यक कागदपत्रे - शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला/ बोनाफाईट प्रमाणपत्र, रेशनकार्ड, आधारकार्ड छायांकित प्रत, लाईट बिल नॉनक्रिमीलेअर आवश्यक कागदपत्रे - शाळा सोडल्याचा दाखला/बोनाफाईट, जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, रेशनकार्ड, स्वयंघोषणापत्र राज्य आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र आवश्यक कागदपत्रे - शाळा सोडल्याचा दाखला, ८ लाख आतील उत्पन्न प्रमाणपत्र, १९६७ चा पुरावा, स्वयंघोषणापत्र, परिशिष्ठ केंद्र आर्थिक दुर्बल घटक प्रमाणपत्र आवश्यक कागदपत्रे - शाळा सोडल्याचा दाखला, ८ लाख आतील उत्पन्न प्रमाणपत्र, १९६७ चा पुरावा, स्वयंघोषणापत्र,परिशिष्ठ सामाजिक सहाय्यता कार्यक्रमांतर्गत विशेष सहाय्य योजना संजय गांधी निराधार अनुदान योजना (सर्वसाधारण/ अनु. जाती/अनु.जमाती) - निराधार विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत महिला, अपंग, दुर्धर आजाराने पीडित व्यक्ती, अनाथ मुले/मुली, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पत्नी, तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्याची पत्नी यांना या योजनेचा लाभ देय आहे. त्यासाठी रहिवासी दाखला, इतर सर्व लाभार्थ्यांकरिता रु. २१०००/- व दिव्यांग लाभार्थ्यासाठी रु. ५००००/- उत्पन्न दाखला, वयाचा दाखला, दिव्यांग प्रमाणपत्र, असमर्थतेचा/ रोगाचा दाखला, अनाथ असल्याचा दाखला, आधार कार्डची छायांकित प्रत, बँक पासबुक (राष्ट्रीयकृत बँक), रेशन कार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत. या योजनेतून दरमहा रक्कम रु. १०००/- (प्रती लाभार्थी), अपत्यहिन विधवा लाभार्थ्यास दरमहा रू.१०००/- एक अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यास दरमहा रू.११००/ -, २ अपत्ये असलेल्या विधवा लाभार्थ्यास दरमहा रू.१२००/- अनुदान देय आहे.

**श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना (सर्वसाधारण/अनु. जाती/अनु.जमाती)** - वय वर्ष ६५ पूर्ण असलेले निराधार स्त्री / पुरुष यांना या योजनेचा लाभ देय आहे.यासाठी रहिवासी दाखला, इतर सर्व लाभार्थ्यांसाठी रु. २१०००/ - व दिव्यांग लाभार्थ्यासाठी रु. ५००००/- उत्पन्न दाखला, वयाचा दाखला, दिव्यांग प्रमाणपत्र, असमर्थतेचा/रोगाचा दाखला, आधार कार्डची छायांकित प्रत, बँक पासबुक (राष्ट्रीयकृत बँक), रेशन कार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत. या योजनेतून दरमहा रक्कम रु १,०००/- (प्रति लाभार्थी), अपत्यहिन विधवा लाभार्थीस दरमहा रु.१०००/-, एक अपत्य असलेल्या विधवा लाभार्थ्यास दहमहा रु. ११००/-, २ अपत्ये असलेल्या विधवा लाभार्थ्यास दरमहा रू. १२००/ अनुदान देय आहे.

**इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना (केंद्र पुरस्कृत योजना)** - वय वर्ष ६५ व अधिक असलेले स्त्री / पुरुष यांना या योजनेचा लाभ देय आहे.यासाठी रहिवासी दाखला, दारिद्र्यरेषेचा दाखला, वयाचा दाखला, आधार कार्डची छायांकित प्रत, बँक पासबुक (राष्ट्रीयकृत बँक), रेशन कार्ड ही कागदपत्रे आवश्यक आहेत. या योजनेतून दरमहा रक्कम रु. १०००/- प्रती लाभार्थी (वय वर्ष ६५ ते ७९ राज्य शासन ८०० + केंद्र शासन २००) (वय वर्ष ८० व अधिक राज्य शासन ५०० + केंद्र शासन ५००) अनुदान देय आहे.

**इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना (केंद्र पुरस्कृत योजना)** -

वय वर्ष ४० ते ७९ वयोगटातील विधवा स्त्रियांना या योजनेचा लाभ देय आहे. यासाठी रहिवासी दाखला, दारिद्र्यरेषेचा दाखला, वयाचा दाखला, आधार कार्डची छायांकित प्रत, बँक पासबुक (राष्ट्रीयकृत बँक), रेशन कार्ड, पतीचा मृत्यू दाखला ही कागदपत्रे आवश्यक आहेत. या योजनेतून दरमहा रक्कम रु. १०००/- प्रती लाभार्थी (राज्य शासन ७०० + केंद्र शासन ३००) अनुदान देय आहे.

**इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना (केंद्र पुरस्कृत योजना)** - वय वर्ष १८ ते ७९ वयोगटातील दिव्यांगांना या योजनेचा लाभ देय आहे. यासाठी रहिवासी दाखला, दारिद्र्यरेषेचा दाखला, वयाचा दाखला, आधार कार्डची छायांकित प्रत, बँक पासबुक (राष्ट्रीयकृत बँक), रेशन कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्र ही कागदपत्रे आवश्यक आहेत. या योजनेतून दरमहा रक्कम रु. १०००/- प्रती लाभार्थी (राज्य शासन ७०० + केंद्र शासन ३००) अनुदान देय आहे.

**राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना (केंद्र पुरस्कृत योजना)** - वय वर्ष १८ ते ५९ वयोगटातील कर्ता स्त्री/पुरूष मरण पावल्यास वारसांना या योजनेचा लाभ देय आहे. यासाठी वयाचा दाखला, रहिवास प्रमाणपत्र, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाचा पुरावा, मृत्युचा दाखला ही कागदपत्रे आवश्यक आहेत. या योजनेतून मयत व्यक्तिच्या वारसाला एकदाच एकरकमी रक्कम रु. २००००/- अनुदान मिळते. या सर्व योजनांचा साभ घेण्यासाठी तालुक्यासाठी संबंधित तहसिलदार आणि महानगर पालिका क्षेत्राकरिता तहसिलदार शहर संजय गांधी कार्यालय, सोलापूर येथे अर्ज करावा. किंवा लाभार्थ्यांनी अर्ज महा-ई-सेवा केंद्र अथवा समक्ष तहसिल कार्यालयात सादर करणे अनिवार्य आहे.

या सामाजिक सहाय्यता योजनांच्या माध्यमातून समाजातील निराधार, गरजू व्यक्तिंना आर्थिक मदत मिळत आहे. या योजनांतून त्यांना आधार मिळत आहे. एकूणच शासन आपल्या दारीअंतर्गत महाशिबिरांतून महसूल विभागामार्फत देण्यात येणारे विविध प्रकारचे दाखले व सेवा यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, विविध प्रकारची प्रमाणपत्रे, अनुज्ञप्ती व अन्य सेवांसाठी विविध शासकीय कार्यालयांचे खेटे मारायची गरज नाही. महाशिबिराच्या माध्यमातून एकाच छताखाली कमी वेळेत या सेवा दिल्या जाणार आहेत. राज्य शासनाच्या शासन आपल्या दारी या अभियानातून हे सहज शक्य होत आहे.

**(संकलन - संप्रदा बीडकर, जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर)**

# केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत 'महाज्योती'ने अर्थसहाय्य दिलेल्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश!

## अकरा विद्यार्थ्यांना प्रशासकीय सेवेची संधी

नागपूर : केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या नागरी सेवा परीक्षा २०२२ चा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. त्यात 'महाज्योती'ने अर्थसहाय्य दिलेल्या ४४ विद्यार्थ्यांपैकी ११ विद्यार्थ्यांना यश मिळाले आहे. त्यातील ४ विद्यार्थी इतर मागास वर्ग, ३ विद्यार्थी विमुक्त जाती, भटक्या जमाती-ड मधील ३ विद्यार्थ्यांना यश मिळाले आहे तसेच विशेष मागास प्रवर्गातील १ उमेदवारालादेखील अंतिम परीक्षेत यश मिळाले आहे.

महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती),नागपूर या संस्थेमार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना यूपीएससी नागरी सेवा परीक्षेच्या व्यक्तिमत्व चाचणी परीक्षेसाठी प्रत्येकी २५ हजार रुपये अर्थसहाय्य करण्याची योजना राबविण्यात येते.महाज्योतीने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना यूपीएससी नागरी सेवा परीक्षेच्या व्यक्तिमत्व चाचणी परीक्षेकरिता प्रत्येकी २५ हजार रुपये अर्थसहाय्य करण्याची योजना सुरु केली होती. या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रसिद्धी देण्यात आलेली होती, त्याकरिता एकूण ४७ उमेदवारांनी अर्ज केलेले होते. त्यापैकी योजनेसाठी पात्र ४४ विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) नागरी परीक्षेच्या तयारीसाठी प्रत्येकी २५ हजार रुपये इतके अर्थसहाय्य देण्यात आलेले होते.

यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये अभिषेक दुधाळ, ओंकार गुंडगे, पल्लवी सांगळे, शुभाली परिहार, शुभांगी केतन, श्रुती कोकटे, रोशन कच्छाव, अनुराग घुगे, सागर देठे, अनिकेत पाटील, आदित्य पाटील समावेश आहे. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा महाज्योती अध्यक्ष अतुल सावे यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच महाज्योती तर्फे राबविण्यात येणाऱ्या यूपीएससी नागरी सेवा व्यक्तिमत्व चाचणी परीक्षेसाठी आर्थिक सहाय्य योजनेचा अधिकाधिक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### 'महाज्योती'मुळे निश्चिंत मनाने मुलाखत देता आली - शुभाली परिहार

शाळेत असल्यापासून माझे प्रशासकीय अधिकारी बनण्याचे स्वप्न होते. अडचणी होत्या, तरी फोकस सुटू दिला नाही. यूपीएससी मेन्स पास झाले. आता मुलाखतीचे दिव्य पार करावे लागणार होते आणि त्यासाठी दिल्लीत जाऊन एक आठवडा राहायचे होते. मुलाखत पास करण्यासोबत दिल्लीत निवास व भोजनाचे टेंशन होते. त्यावेळी महाज्योतीतर्फे आर्थिक सहाय्य योजनेची खूप मदत झाली. आर्थिक सुरक्षिततेने बळ वाढवले, निश्चिंत मनाने मुलाखत देता आली. मला अभिमान वाटतो की आर्थिक विवंचनेत अधिकारी होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या मागास प्रवर्गातील विद्यार्थांना महाज्योतीची मदत आहे.

### महाज्योतीने केले आत्मनिर्भर - रोशन कच्छाव

मी इंजिनियरींग करत असताना यूपीएससी साठी प्रयत्न सुरु केले. अधिकारी बनण्याचे स्वप्न मला स्वस्थ बसू देत नव्हते. अखेर चौथ्या प्रयत्नात पास झालो. यूपीएससी मध्ये यूपीएससी पूर्व परीक्षा, यूपीएससी मुख्य परीक्षा, यूपीएससी मुलाखत या टप्प्यातून जावे लागते. उमेदवाराला या तीनही पायऱ्या पूर्ण कराव्या लागतात. उमेदवार जर कोणत्याही परीक्षमध्ये नापास झाला तर त्याला परत पहिल्यापासून म्हणजे पूर्व परीक्षेपासून प्रयत्न सुरू करावे लागते. या सर्वात वेळेबरोबरच जवळचा पैसाही खर्च होतो. माझ्यासारख्या विद्यार्थ्यांना अभ्यासावर संपूर्ण फोकस करता येत नाही. सारखी पैशांची काळजी लागून राहिलेली असते. त्यामुळे अपेक्षित निकाल लागत नाही. यावेळी महाज्योतीच्या अर्थसहाय्य योजनेची खूप मदत झाली. महाज्योती अशा योजनांच्या माध्यमातून माझ्यासारख्या असंख्य मुलांना प्रशिक्षण देऊन, अर्थसहाय्य करुन स्वत:च्या पायावर उभे राहण्यास आत्मनिर्भर बनविण्याचे मोठे काम करीत आहे.

पान १ वरुन

### शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ..

संताप व्यक्त केला. ते म्हणाले की, शेतकऱ्यांच्या सिबिल स्कोअरचा बाऊ करुन कर्ज नाकारणाऱ्या बँकाना धडा शिकवा. ज्या बँका शेतकऱ्यांच्या सिबिल स्कोअरचे कारण देवून शेतकऱ्यांना कर्ज नाकारत आहेत अशा बँकांवर गुन्हे दाखल करा.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बोगस बियाणे आणि बोगस खतं शेतकऱ्यांकडे पोहोचतात. त्यावर शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष केलं जातं. त्या तक्रारी दूर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. बँका राज्य सरकारच्या भूमिकेला मानत नाहीत. पण यापुढे असं झालं तर त्यावर कारवाई केल्याशिवाय राहणार नाही. या बँकांना झटका दिल्याशिवाय जमणार नाही. राज्यात लागू असलेली सौरउर्जा कृषीपंप योजना ही आता केंद्र सरकार देशभर राबवणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

### अहंकारी, स्वार्थी माणूस देश ..

लोकांनी आपल्या अधिकारांसाठी मोठी लढाई लढली. मोदी सरकारने अध्यादेश काढून आमची ताकद हिरावून घेतली. आठ वर्षांच्या लढ्यानंतर सुप्रीम कोर्टाने आमच्या बाजून निकाल दिला. पण आठ दिवसांच्या आत सरकारने अध्यादेश काढून आमचे अधिकार काढून घेतले. अध्यादेशाचा निर्णय अहंकारातून आला आहे. अहंकारी आणि स्वार्थी माणून देश चालवू शकत नाही. दिल्लीच्या लढाईत उद्धव ठाकरेंची साथ मिळाली आहे, असं अरविंद केजरीवाल यांनी म्हटलं.

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची काल (२३ मे) भेट घेतल्यानंतर अरविंद केजरीवाल संध्याकाळी मुंबईत दाखल झाले. आज (२४ मे) अरविंद केजरीवाल यांनी मातोश्रीवर जाऊन ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. तर उद्या म्हणजेच २५ मे रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेणार आहेत. याआधी केंद्राच्या अध्यादेशासंदर्भात बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांची देखील केजरीवाल यांनी भेट घेतली होती.

दिल्लीमध्ये अधिकाऱ्यांच्या पोस्टिंगमध्ये राज्य सरकारलाही वाव देणारा आदेश सुप्रीम कोर्टाच्या घटनापीठानं ११ मे रोजी दिला होता. पण केंद्र सरकारने अवघ्या आठ दिवसात अध्यादेश आणत हा निकालच रद्दबातल केला. दिल्ली हे पूर्ण राज्य नाही. त्यामुळे इथे केंद्रच सुप्रीम असलं पाहिजे असं म्हणत या अध्यादेशात सगळे अधिकार पुन्हा उपराज्यपालांकडे दिले आहेत. त्यामुळे या अध्यादेशाचं पुढे काय होतं हे पाहणं औत्सुक्याचं असणार आहे. हाच केंद्र सरकारचा अध्यादेश राज्यसभेत रोखण्यासाठी अरविंद केजरीवाल यांनी मोहीम राबवली आहे. त्यासंदर्भात अरविंद केजरीवाल विरोधी पक्षातील नेत्यांच्या गाठीभेटी घेत आहेत.

### ज्ञानवापी प्रकरणी सातही याचिकांची

शक्यता आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणांची एकत्रित सुनावणी होणे हिताचे ठरेल. ज्ञानवापी संबंधित सातही खटल्यांची एकत्रित सुनावणी घेण्याच्या निर्णयाला विरोध करताना मुस्लीम पक्षातर्फे वकील मोहम्मद तौहीद खान यांनी सांगितले की, ज्ञानवापीशी संबंधित मुद्द्यांची एकत्रित सुनावणी व्हावी अशा टप्प्यावर अद्याप हे प्रकरण पोहोचलेले नाही. न्यायालयाने सर्व प्रकरणांचे पुरावे तपासायला हवे होते आणि पुरावे तेच राहिले असते तर असा निकाल देणे योग्य ठरले असते. विशेष म्हणजे, ऑगस्ट २०२१ मध्य पाच महिलांनी स्थानिक न्यायालयात याचिका दाखल करून मशिदीच्या आवारात असलेल्या माँ शृंगार गौरी स्थळावर नियमित पुजेचा अधिकार देण्याची मागणी केली होती. त्यावर सुनावणी करताना जिल्हा न्यायाधीशांनी हे सातही खटले एकाच स्वरूपाचे असल्याचे सांगत त्यांची एकत्रित सुनावणी करण्याचे आदेश दिले आहेत.

# 'समान संधी केंद्र' विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त
## समाजकल्याण आयुक्त डॉ.प्रशांत नारनवरे

मुंबई : सामाजिक न्याय विभागातर्फे सुरु करण्यात आलेली 'समान संधी केंद्र' ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, आर्थिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असून विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाजकल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी केले.रुईया कॉलेज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या प्रचार प्रसिद्धी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी समाजकल्याण उपायुक्त वंदना कोचुरे, रुईया कॉलेजच्या प्राचार्य वर्षा शुक्ला, मुंबई शहरचे सहायक आयुक्त प्रसाद खैरनार, रायगडचे सहाय्यक आयुक्त सुनील जाधव उपस्थित होते.

डॉ. नारनवरे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक अभ्यास न करता बदलत्या तंत्रज्ञानानुसार तंत्रज्ञान अवगत करावे. भविष्याचा विचार करून वेगवेगळ्या क्षेत्रातले ज्ञान प्राप्त करावे. शासनाच्या विविध योजनांची माहिती समान संधी केंद्राद्वारे विद्यार्थ्यांना मिळण्यास निश्चित मदत मिळेल. कौशल विकासावर आधारित जपान व भारतामध्ये वेगवेगळ्या बाबतीत केंद्र सरकारचे करार झालेले असून त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना जपानमध्ये सुद्धा नोकरीची संधी उपलब्ध होऊ शकते. महाराष्ट्रात सुमारे १५ हजार महाविद्यालयात समान संधी केंद्र सुरु करण्यात आली आहेत, असेही यावेळी डॉ. नारनवरे यांनी सांगितले.या कार्यक्रमात प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण मुंबई विभाग कार्यालयाने तयार केलेल्या लाभार्थ्यांच्या यशोगाथा व समान संधी केंद्र या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन, सहायक आयुक्त,



समाज कल्याण, रायगड या कार्यालयामार्फत तयार करण्यात आलेल्या आस्थापना व लेखा विषयक प्रणालीच्या ऑनलाईन पोर्टलचे उद्घाटन तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत प्रकरणाची सद्यस्थिती व नुकसान भरपाई या अँड्रॉईड मोबाईल प्रणालीचे उदघाट्न डॉ. नारनवरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# काँग्रेसच्या पंढरपूर तालुकाध्यक्षपदी हनुमंत मोरे



पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीचे नूतन अध्यक्ष म्हणून मोरे यांना अधिकृत नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील प्रदेश काँग्रेस कार्यालयात हे नियुक्त पत्र त्यांना प्रधान करण्यात आले पंढरपूर तालुक्यातील पदाचा वाद संपुष्टात आला आहे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी मार्फत मागील काही दिवसात जिल्ह्यातील व तालुका आणि शहराध्यक्ष पदांच्या निवडी करण्यात आल्या होत्या पण प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नाना पटोले यांनी जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील यांना याबाबत पत्राद्वारे कळवले होते सोलापूर जिल्हा काँग्रेसचे नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्तक्षेपामुळे या नियुक्तीच्या तात्पुरत्या स्थगित करण्यात आल्या होत्या अधून मधून काँग्रेस नेत्यांकडून नवीन निवड केलेल्या अध्यक्षांना काम करण्याबाबत सांगण्यात येत होती पण पंढरपूर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हनुमंत मोरे हे वरिष्ठांच्या सांगण्यानुसार काम करत होते प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या सोलापूर दौऱ्यात त्यांनी २१ मे रोजी हा वाद संपुष्टात आणणार असल्याने अशी जाहीर केले होते

त्यानुसार दोन दिवसांपूर्वी त्यांची काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशील कुमार शिंदे यांच्याशी विचारविनिमय केला केला होता व सुशीलकुमार शिंदे आणि पटोले यांच्या वार्तालापानंतर पटवली यांनी सोलापूर जिल्ह्यातील अनेक तालुकाध्यक्षांना तातडीने मुंबई येथील प्रदेश काँग्रेस कार्यालयात मंगळवारी बोलावून घेतले होते व त्यावेळी जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील हे हजर होते. पंढरपूर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हनुमंत मोरे यांना सन्मानाने नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आली वही नियुक्तीपत्र घेऊन मोरे यांनी काँग्रेस नेते सुष्मार शिंदे यांची मुंबई ते निवासस्थाने व्याख्या व सुशिल कुमार शिंदे यांच्या आशीर्वाद घेऊन पंढरपूरला परतले या निवडीमुळे पंढरपूर तालुक्यात काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे

# बांधकाम परवानगी प्राप्त भूखंडावर स्वतंत्ररित्या अकृषिक परवानगीची आवश्यकता नाही : महसूल मंत्री विखे-पाटील

मुंबई : एखाद्या जमिनीवर बांधकाम परवानगी अथवा रेखांकन मंजुरी देण्यात आली असताना अशा जमिनीमध्ये प्रस्तावित अकृषिक प्रयोजनाचा वापर अनुज्ञेय असल्याची खात्री करण्यात येते. ही खात्री केल्यानंतर अशा जमिनींकरिता स्वतंत्रपणे अकृषिक परवानगीची गरज नसल्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांनी स्पष्ट केले आहे.



महसूल व वन विभागामार्फत २३ मे २०२३ रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयात याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. या शासन निर्णयानुसार अकृषिक प्रयोजनांचा वापर अनुज्ञेय असल्याची खात्री केल्यानंतर या जमिनींकरिता महाराष्ट्र जमीन संहिता, १९६६ च्या कलम ४२-अ, ४२-ब, ४२-क, ४२-ड किंवा ४४-अ अन्वये स्वतंत्रपणे अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. अशा जमिनी अकृषिक वापरात रुपांतरित झाल्याचे मानण्यात येत असल्याने, अशा जमिनींबाबत सक्षम प्राधिकरणाने बांधकाम परवानगी दिल्यास संबंधित जमीनधारकास/ भूखंडधारकास/ विकासकास स्वतंत्रपणे अकृषिक परवानगी घेण्याची आवश्यकता नसल्याचे श्री. विखे-पाटील यांनी सांगितले.जमीन भोगवटदार वर्ग-१ या धारणाधिकाराची असल्यास बीपीएमएस (Building Plan Management System (BPMS)) प्रणालीतच आवश्यकता असेल तिथे रुपांतर कर वसूल केला जाईल व विकास परवानगी सोबतच अकृषिक वापराची सनद निर्गमित करण्यात येईल. जमीन वर्ग-२ धारणाधिकाराची असल्यास, नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय रकमांची देणी इ. रकमांची परिगणना करण्यात यावी आणि या रकमांचा भरणा केल्यावर सक्षम महसूल अधिकारी यांनी तसे प्रमाणित केल्यानंतर बीपीएमएस यंत्रणेद्वारे विकास परवानगी देणे बंधनकारक राहील व अशा प्रकरणी सुद्धा अकृषिक वापराची सनद सोबतच निर्गमित होईल. ही सनद स्वयंचलित (System generated) स्वरुपाची असेल व अशा सर्व प्रकरणांमध्ये सनदेची एक प्रत ऑनलाईन (electronically) गाव दप्तरात नोंद घेण्यासाठी जाईल व परवानगी घेणाऱ्यावर पुढे नियमित देय अकृषिक सारा भरणे बंधनकारक राहील.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्रा.एम.एम.पवार यांना पीएच.डी.प्राप्त



पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्युटचे कॅम्पस इन्चार्ज, वसतिगृहाचे व्यवस्थापक व स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्रा.मुकुंद मारुती पवार यांना सिव्हील इंजिनिअरिंगमधून 'फिजीबिलीटी ऑफ कन्वर्जन एक्झीटींग वॉटर स्कीम इन टू २४ ७ कंटीन्युअस वॉटर सप्लाय' या विषयात पीएच.डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी आपला शोधप्रबंध पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर मध्ये सादर केला होता.

स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांच्या प्रेरणेने व डॉ.नितिन सोनजे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली प्रा.पवार यांनी पीएच.डी.पूर्ण केली. त्यांना वडील मारुती पवार, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.प्रशांत पवार, स्वेरीतच कार्यरत असणाऱ्या त्यांच्या पत्नी डॉ.मिनाक्षी पवार यांच्यासह स्वेरीच्या इतर प्राध्यापकांचेही सहकार्य लाभल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले. 'स्वेरी' या संस्थेच्या नावातच 'रिसर्च' हा शब्द असल्याने सुरुवातीपासूनच स्वेरीमध्ये संशोधनास प्रोत्साहन दिले जाते. स्वेरीमध्ये असणारे संशोधनपूरक वातावरण, संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे सरांचे विशेष मार्गदर्शन, विविध संस्थासोबत असणारे सामंजस्य करार, उपलब्ध असणाऱ्या विविध संशोधनपर प्रयोगशाळा या सर्व बाबींमुळे स्वेरीतील वातावरण हे संशोधनास अतिशय पोषक बनले आहे. या सर्व बाबींचा एकत्रित परिणाम म्हणजे स्वेरीतील पीएच.डी. प्राप्त प्राध्यापकांची संख्या वरचेवर वाढत आहे. आज स्वेरीमध्ये सुमारे ३५ प्राध्यापक हे पीएच.डी. धारक असून सुमारे ३० प्राध्यापकांची पीएच.डी. सुरू आहे. वाढत्या व्यापामधून डॉ.पवार यांनी पीएच.डी. पूर्ण केल्याबद्दल त्यांचा स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या हस्ते व डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी.मिसाळ, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.प्रशांत पवार व बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. विद्यार्थी प्रिय असलेले डॉ.पवार हे स्वेरीमध्ये २००१ पासून कार्यरत असून त्यांनी ज्ञानदानाबरोबरच जवळपास १४०० विद्यार्थी व ११०० विद्यार्थिनी असलेल्या ६ वसतिगृहांचे स्थापनेपासून पालकत्व स्वीकारले आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांवर उत्तम संस्कार करत 'शिक्षणाशिवाय पर्याय नाही' या मतावर ठाम असलेल्या डॉ.पवार यांचा विद्यार्थ्यांवर उत्तम कंट्रोल असल्यामुळे पालक देखील निश्चिंत असतात. स्वेरीतील प्रत्येक कार्यक्रमाचे, येणाऱ्या पाहुण्यांचे उत्तम नियोजन करून अनेक कार्यक्रम यशस्वी करण्यात पडद्यामागची भूमिका ते उत्तम प्रकारे पार पाडत असतात. पीएच.डी. प्राप्त केल्या बद्धल डॉ.मुकुंद पवार यांचे स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख, इतर पदाधिकारी व विश्वस्त, संस्थेंअंतर्गत असणाऱ्या बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ.संदीप वांगीकर, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

# सोलापूर विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी डॉ. गौतम कांबळे




सोलापूर/प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे यांची नियुक्ती झाल्याची घोषणा प्रभारी कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी बुधवारी केली.

बुधवारी दुपारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक प्रभारी कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी ही घोषणा करण्यात आली. यास सर्वांनी मान्यता दिली. नियुक्तीझाल्यानंतर नूतन प्र-कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. गौतम कांबळे हे अर्थशास्त्राचे प्राध्यापक असून त्यांचे बीए, एमए, एम फिल, पीएच. डीचे शिक्षण शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून पूर्ण झाले आहे. उच्च शिक्षण क्षेत्रातील २४ वर्षे अध्यापनाचा दांडगा अनुभव त्यांना आहे.

ग्रामीण विकास, सामाजिक क्षेत्र आणि कृषी क्षेत्राचे अर्थकारण या विषयावर त्यांचे विशेष अभ्यास व संशोधन आहे. प्रशासकीय कामाचाही संचालक व विभाग प्रमुख म्हणून त्यांना सहा वर्षाचा अनुभव आहे. त्यांचे अनेक शोध निबंध व पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली दहा विद्यार्थ्यांनी पीएच.डी पूर्ण केलेली आहे व पाच विद्यार्थी पीएचडी करत आहेत. मलेशिया आणि फिनलँड परदेश अभ्यास दौरा देखील त्यांचा पूर्ण झालेला आहे. डॉ. कांबळे यांनी अधिसभा, व्यवस्थापन परिषद विद्या परिषद परीक्षा व मूल्यमापन मंडळ या सर्व अधिकार मंडळांवर त्यांनी काम केलेले आहे. त्यांचे ५ संशोधन प्रकल्प पूर्ण झालेत. अशा अभ्यासू व तज्ञ प्राध्यापकाची विद्यापीठाचे प्र-कुलगुरू म्हणून डॉ. कांबळे यांच्या रूपाने निवड झाल्याचे प्रभारी कुलगुरू डॉ. कामत यांनी सांगितले. नवीन विद्यापीठ सुधारणा कायद्यानुसार निवड झालेले डॉ. कांबळे हे पहिलेच प्र-कुलगुरू ठरले आहेत.

# प्रगतशील शेतकरी संतोष नाना सावंत यांना स्पीड आयकॉन पुरस्कार २०२३




शिरोळ/नामदेव निर्मळेः अकिवाट तालुका शिरोळ येथील प्रगतशील शेतकरी संतोष नाना सावंत यांना स्पीड आयकॉन पुरस्कार २०२३ प्राप्त झाला. या प्रगतशील शेतकऱ्याने २० गुंठ्यामध्ये १० प्रकारची पिके सेंद्रिय पद्धतीने घेतलेली होती. याची दखल प्रसार माध्यमाने घेतलेली होती. २० गुंठ्यामध्ये १० प्रकारची सेंद्रिय पिके घेऊन सर्वांना आश्चर्यचकित केले होते. शेतातील पीक पाहण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी गर्दी केली होती. सेंद्रिय शेती कशी करावी हे या शेतकऱ्याकडून शिकावे लागेल. अनेकांचे हे शेतकरी प्रेरणास्थान बनले आहे. सेंद्रिय शेतीचे महत्त्व आता लोकांना कळू लागले आहे.



**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्र. कुलगुरू पदी डॉ. गौतम कांबळे सर यांची निवड झाल्याबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष तथा सोलापूर विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य लोकनेते राजाभाऊ सरवदे यांच्या हस्ते पक्ष कार्यालयात सत्कार करण्यात आला**


# नोंदणीकृत कामगारांची संख्या वाढवून त्यांना सुविधा द्यावी : कामगार मंत्री सुरेश खाडे



मुंबई : राज्यात असंघटीत क्षेत्रातील कुठलाही कामगार नोंदणीपासून वंचित राहू नये. यासाठी विभागाने कामगारांची मोहीम स्तरावर नोंदणी करावी. नोंदणीकृत कामगारांना सुविधांचा लाभ द्यावा, असे निर्देश कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे यासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मंत्री श्री. खाडे बोलत होते. बैठकीला कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनीता वेद सिंगल, कामगार आयुक्त श्री. देशमुख, बाष्पके संचालक श्री. अंतापूरकर आदी उपस्थित होते.राज्य कामगार विमा योजनेंतर्गत कामगार रूग्णालयांसाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना करीत मंत्री श्री. खाडे म्हणाले, ईएसआय रूग्णालयांसाठी प्रत्येक जिल्ह्यात एमआयडीसी परिसरात जागा मिळवून द्यावी. तसेच कामगार भवनसाठीसुद्धा जागेची उपलब्धता करावी. जागेसाठी संबंधित जिल्हाधिकारी व एमआयडीसी अधिकाऱ्यांशी पाठपुरावा करावा. कामगार भवन व रूग्णालय इमारतीचे डिझाईन तयार करावे. जेथे जागा उपलब्ध झाली, तेथे जागा ताब्यात घेऊन अंदाजपत्रके तयार करावी. कामगारांच्या सुविधांसाठी कामगार भवन उपयुक्त ठरणार आहे. त्याचप्रमाणे

बॉयलर प्रशिक्षण केंद्राची स्थापना एमआयडीसी परीसरात करावयाची आहे. त्यासाठी जागेची निश्चिती करावी.मंत्री श्री. खाडे पुढे म्हणाले, ई श्रम पोर्टलवर नोंदणी वाढवावी. त्यासाठी मोठ्या ग्रामपंचायत स्तरावर शिबिरे घ्यावी. विटभट्टी, रोहयो कामगार आदींची प्राधान्याने नोंदणी करावी. नोंदणी केलेल्या कामगारांना कार्डचे वितरण पूर्ण करावे. कामगारांना मध्यान्ह भोजन योजनेचा लाभ देण्यात येत आहे. त्यासाठी नोंदणी केलेले कार्ड आवश्यक आहे. त्यामुळे ही कारवाई पूर्ण करावी. नाका कामगारांना बसण्यासाठी विभागाच्यावतीने नाका शेड उभारण्यात येणार आहे. यामध्ये बसण्याची, पाण्याची व्यवस्था असणार आहे. नाका कामगारांना नोंदणी करून पासबुक द्यावे. या पासबुकमध्ये ९० दिवस कामाच्या नोंदणीची व्यवस्था असावी. त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात कार्यवाही सुरू करावी, अशा सूचना मंत्री श्री. खाडे यांनी दिल्या. बैठकीला प्रधान सचिव श्रीमती सिंगल यांनीही मार्गदर्शन केले. बैठकीला कामगार विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## शब्दकोडे क्र १४४



आडवे शब्द १. चिंचा आल्यात पाडाला- या गीतातील पुढील ओळ ७. वैदूकडची औषधे १०. थेट, सरळ ११. हा खाताना घशात काटा अडकतो १२. मालाचा उठाव १४. मिळाला म्हणजे फायद्याचाच ठरला की! १५. जिजाबाईंचा पुत्र १७. जिरवण्याची ताकद २०. आवडता, प्रिय २१. नंतरचे नवराबायको २२. नमुनेदार २५. दक्षिणा वाटण्याची जागा २७. अति भयानक २९. रेशमाची गुंडाळी (अ.व.) ३०. 'कँटीन' असल्यावर हा कशाला? ३३. भलतेच विरुद्ध ३५. निर्बुद्ध, ढ ३६. दोनवेळा म्हटल्यास कटकट ३७. या काळातील घटना कुणाला कळल्यात! ३८. चकमक ४०. त्वरित, रातोरात ४१. रानरेडा ४२. नातवंडे म्हणजे दुधावरची --! ४३. दुलई ४४. उत्तराधिकारी ४७. फटाक्यात ठासून भरलेला मसाला ४८. काळ्या तोंडाचे माकड ५१. खोदकाम ५२. लिंबूपाणी ५४. न्याहरी-कधी उपासाची, कधी दिवाळीची! ५५. दुसऱ्यासाठी खिशाला चाट ५७. ओळख पटवणारे वैशिष्ट्य ५९. संपणे ६०. जन्मदाता, पिता ६१. माळी ६३. जगातील सगळ्यात घातक कीटक ६५. 'आ'काराची रेषा ६६. आमिषादाखल दाखवण्याचे कंदमूळ ६७. हे शहर काही आता पेन्शनरांचे राहिलेले नाही ६८. पंख ६९. किमान हालचाल ७१. वृद्ध ७२. '--सांगे ज्याला त्याला, वेड लागले राधेला' ७३. धमनी ७४. लोकरूढी, प्रथा ७७. बूड ७८. कोंब, अंकुर ७९. भिंतीवरून सरपटणारा प्राणी ८०. कबूतर ८१. दक्ष, दक्षतेचा इशारा

उभे शब्द १. जादूगाराचे कौशल्य-शर्विलकाच्याही हाती २. शेवट ३. हुबेहूब सोंग वठवणारा ४. घराची अब्रू घालवणारा ५. शंकराचे एक नाव ६. तिबेटी धर्मगुरु ७. पत्ता, शोध ८. तट्ट, फुगलेले ९. लक्ष पण अवधान नाही ११अ. गणेशमंदिरामुळे प्रसिद्ध असलेली पुण्यातील बाग १३. मजल, टप्पा १६. नियमित यात्रा करणारा १८. भरपूर कमाईचे 'जाडजूड; विशेषण १९. दरी २२. बांधकामासाठी कालवलेले मिश्रण २३. फुलांचे दागदागिने २४. टाळ्यांचा आवाज २६. सुकवलेली काळी द्राक्षे २८. रात्रभर ३१. लहान मूल ३२. आदित्यवार ३४. संत ज्ञानेश्वारांनी केलेली प्रार्थना ३५. बंदी, मज्जाव ३७. शिवशाहीचा ध्वज ३९. लिहिलेला लेख, संदेश इ. ४०. बांबूची मोठी टोपली, हारा ४५. एकरुप ४६. काम इ. लांबणे ४८. वारा, वायू, त्रास ४९. कच्चे लिखाण (इंग्रजी) ५०. वेदनेने ओरडणे, हळहळ व्यक्त करणे ५२. हुक्की, लहर ५३. अव्यवस्था, गोंधळ ५५. पाठशिवणीचा खेळ ५६. -- --- म्हणून लांडोरही नाचते (म्हण) ५७. हिंदीत रक्त ५८. चक्र ६०. पशू ६२. पुरुष ६४. राजाचा सैनिकी अधिकारी ६५. कान व डोळा यामधील भाग ६७. प्राचीन, जुने ७०. टक, दृष्टी ७५. कोरा ७६. त्याप्रमाणे

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरांचे संवर्धन आराखड्यास मुख्यमंत्री अध्यक्षतेखालील शिखर समितीची मान्यता : गहिनीनाथ महाराज औसेकर

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिराच्या संवर्धन विकास कामास शासनाने अंदाजपत्रकामध्ये रक्कम रू.७३.८५/- कोटीची तरतूद केली होती. त्याअनुषंगाने मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २३ मे, २०२३ रोजी मंत्रालय, मुंबई येथे शिखर समितीची बैठक संपन्न झाली. त्यामध्ये सदर आराखड्यास शिखर समितीने मान्यता दिली असल्याची माहिती मंदिरे समितीचे सह अध्यक्ष श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर व कार्यकारी अधिकारी श्री.तुषार ठोंबरे यांनी दिली.

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर हे खूप जूने, ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि प्रुवातत्विय महत्व असणारे मंदिर आहे. मात्र, यामध्ये काळाच्या ओघात आणि नैसर्गिक आणि मानवनिर्मित कारणांमुळे बरेच बदल झाले असून अनेक ठिकाणी मंदिराचे बांधकाम दुरुस्तीला आले असल्याने गेल्या अनेक वर्षापासून मंदिराचा विकास आराखडा प्रस्तावित होता. मंदिर सर्वकष विकास आराखडा तयार करणेकामी पुरातत्व विभागाच्या नामांकित सुचीतील वास्तुविशारदाची नियुक्ती करून आराखडा तयार केला व त्यास पुरातत्व विभागाची मान्यता घेऊन शासन मान्यतेसाठी सादर केला होता. सदर आराखड्याची अंदाजपत्रकीय रक्कम रू.७३.८५/- कोटी असून, यानुसार कामे पूर्ण झाल्यानंतर मंदिरास प्राचीन मुळ रूप प्राप्त होणार आहे.



या आराखड्यामध्ये विठ्ठल मंदिर व सभामंडप, रूक्मिणी मंदिर, महालक्ष्मी मंदिर, नामदेव पायरी व नगारखाना, पडसाळ, छोटी मंदिरे विनायक मंदिर, व्यंकटेश मंदिर, टेन्साईल वर्क (आतील व बाहेरील), दर्शनबारी, स्ट्रक्चरल ऑडीट, वॉटर सप्लाय व ड्रेनेज, इलेक्ट्रीकल वर्क, साऊंड सिस्टीम, फायर फायटींग सिस्टीम, लक्ष्मण पाटील देवस्थान, अंबाबाई मंदिर, श्री.रोकडोबा मंदिर, श्री.सोमेश्वर मंदिर, श्री.विठ्ठल मंदिर सभामंडप सागवाणी काम, इतर परिवार देवता मंदिरे, कमान बांधकाम व इतर अनुषंगीक कामे प्रस्तावित आहे.

सन २०२२ च्या आषाढी व कार्तिकी यात्रेच्या निमित्ताने मा मुख्यमंत्री महोदय व मा उपमुख्यमंत्री महोदय हे श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरामध्ये शासकीय पुजेसाठी उपस्थित होते. सदर वेळी मंदिर समितीच्या वतीने सह अध्यक्ष श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिसरातील परिवार देवतांच्या मंदिराच्या जिर्णोद्वाराच्या अनुषंगाने आवश्यक तो निधी उपलब्ध होऊन जिर्णोद्वार व्हावा अशी मागणी केली होती.

सदरचा आराखडा (अंदाजित रक्कम रू.७३.८५/-) हा पुरातत्व खात्याच्या सल्ल्याने व जिर्णोद्वाराच्या संबंधित आवश्यक त्या सर्व कायद्यातील तरतूदीचा अवलंब करून तयार करण्यात आलेला असून, सदर आराखड्याला मंदिर समितीने दि.१८/०८/२०२१ रोजी व जिल्हास्तरीय समितीने दि.२५/०६/२०२२ रोजी मान्यता दिली होती. तसेच मा मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने दि.१५/१२/२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे. तथापि, मा मुख्यमंत्री महोदयाच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीची मान्यता प्रलंबित होती.ना.एकनाथजी शिंदे, मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २३ मे, २०२३ रोजी मंत्रालय, मुंबई येथे शिखर समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीस मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री महोदय, मा.ना.श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, पालकमंत्री महोदय, मंदिर समितीचे सह अध्यक्ष श्री.गहिनीनाथ महाराज औसेकर, जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, विविध खात्याचे अधिकारी उपस्थित होते. सदर आराखड्यातील प्रस्तावित कामे लवकरच विहित प्रक्रिया राबवून पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# काळे व भालके गटाला दे धक्का..माजी सरपंच यांचा अभिजीत पाटलांच्या गटात जाहीर प्रवेश

## उपरी गावचे मा.सरपंच दत्तात्रय माणिक नागणे यांचे अभिजीत पाटील यांच्या परड्यात वजन



पंढरपूर/प्रतिनिधीः सहकार शिरोमणी वसंतराव सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीचे बिगूल वाजल्याने श्री विठ्ठल सह.साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांचा भाळवणी गटामध्ये उपरी गाव भेट दौरा असताना उपरीचे माजी सरपंच दत्तात्रय माणिकराव नागणे व महादेव माणिकराव नागणे यांनी अभिजीत पाटील गटामध्ये जाहीर प्रवेश केला. एकेकाळी भालके व काळे गटात प्रामाणिकपणे काम केलेल्या सहकाऱ्याला आज अभिजीत पाटलांची ओढ असल्याने चंद्रभागा सहकारी साखर कारखान्यांमध्ये नक्कीच परिवर्तनाची नांदी दिसेल असे असा विश्वास यावेळी व्यक्त केला. सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना काळे भालके गटाचे पदाधिकारी सत्ताधाऱ्यांच्या कामावर नाराज होऊन आमच्याकडे येत आहेत. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या विश्वासावर सभासदांनी विश्वास ठेवला असून त्यांना चांगला ऊस दर देता आला त्याच पद्धतीने सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखाने देखील विठ्ठल प्रमाणे ऊसदर देण्यात येईल असे अभिजीत पाटील यांनी सांगितले. यापुढे विठ्ठल प्रमाणे सहकार शिरोमणी ला दर दिला जाईल या अनुषंगाने काळे भालके गटातील अनेक पदाधिकारी अभिजीत पाटील गटात येण्यास उत्सुक आहेत अशी सर्वत्र चर्चा तालुक्यात होताना दिसत आहे.

यावेळी स्वेरीचे सचिव बी.पी. रोंगेसर, श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक साहेबराव नागणे, बाबुराव नागणे पोपट नागणे, नवनाथ आसबे, नवनाथ नागणे, हनुमंत पाटील, सतीश आसबे, दीपक नागणे, महादेव नागणे, नवनाथ गव्हाणे, अजय मोहिते, हनुमंत जाधव, किसन माने, पांडुरंग नागणे, स्वागत नागणे, महादेव नागणे यांसह आदी उपस्थित होते...

# हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविकेसाठी २० जूनपर्यंत प्रवेशअर्ज स्वीकारणार

सोलापूर/प्रतिनिधीः केंद्र शासनाच्या भारतीय हातमाग तंत्रविज्ञान संस्थेतील सन २०२३-२४ या शैक्षणिक सत्राकरिता तीन वर्षीय (सहा सत्रीय) हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राकरिता प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. इच्छुक उमेदवारांनी परिपूर्ण प्रवेश अर्ज दिनांक २० जून २०२३ पर्यंत प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग कार्यालय यांच्याकडे सादर करावेत, असे राज्याचे वस्त्रोद्योग आयुक्त, एम. जे. प्रदीप चंदन, यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे. या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्र प्रवेशाकरिता महाराष्ट्र राज्यातून बरगढ (ओडिशा) करिता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता १ जागा तसेच व्यंकटगिरी करिता दोन जागा आहेत. उमेदवारांची निवड करण्याकरिता प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर / सोलापूर/ मुंबई / औरंगाबाद यांच्यामार्फत विहित नमुन्यात प्रवेश अर्ज दिनांक २०/०६/२०२३ पर्यंत मागविण्यात येत आहे.

प्रवेश अर्जाचा नमुना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाचे संकेतस्थळ http.www.dirtexmah.gov.in वर उपलब्ध आहे. तसेच सदर अर्जाचा नमुना सर्व प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, यांचे कार्यालयात देखील उपलब्ध आहे, असे पत्रकात म्हटले आहे.

# शिर्डी येथे २८ मे रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे राज्यव्यापी अधिवेशन



सोलापूर/प्रतिनिधी : शिर्डी येथे २८ मे रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले पक्षाचे राज्यव्यापी अधिवेशन पूर्व तयारी बैठकीची सुरूवात आंबेडकर चळवळीतील नेते मनोज संसारे विरेंद्र कांबळे,यशपाल सरवदे यांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ)सोलापूर शहराच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. दलित,आदिवासी, झोपडपट्टीवासी,मराठा,शेतकरी कामगार, विद्यार्थ्यांचे प्रश्न,रोजगार या विविध मागण्यासाठी रिपाइं(आठवले)पक्षाचे राज्यव्यापी महाअधिवेशन आयोजित केले आहे.रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रिय सामाजिक न्याय राज्य मंत्री, संघर्ष नायक मा.रामदासजी आठवले यांच्या नेतृत्त्वाखाली तसेच रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन होणार आहे.या साठी सोलापूर शहराच्या वतीने हॉटेल राज हाईट्स या ठिकाणी शहर कार्यकारणीची नियोजन बैठक लोकनेते राजाभाऊ सरवदे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली व शहर अध्यक्ष अतुल नागटिळक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.या वेळी राजाभाऊ सरवदे यांनी प्रमुख मार्गदर्शन करताना या अधिवेशनाची माहिती दिली.या अधिवेशनास राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस,महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रिपाइं चे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर तसेच सर्व राष्ट्रीय कार्यकारिणी आणि राज्य कार्यकारिणी यांच्या प्रमुख उपस्थितीत हे अधिवेशन होईल असे सांगितले.

आगामी निवडणुकासाठी महाराष्ट्रातून रणशिंग फुंकण्यासाठी हे एकदिवसीय राज्यव्यापी अधिवेशन होईल.राज्यातून अनेक मंत्री या अधिवेशनास उपस्थित राहणार असल्यामुळे स्थानिक पदाधिकारी आणि प्रदेश पदाधिकारी यांच्या वतीने या कार्यक्रमाची जय्यत तयारी चालू असून राज्यातून लाखो रिपाई कार्यकर्ते या अधिवेशनास उपस्थित राहणार आहेत. सोलापूर शहरातून देखील मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आदेश राजाभाऊ सरवदे साहेब यांनी दिले.

हे अधिवेशन येणाऱ्या लोकसभा,विधानसभा तसेच महापालिका निवडणुकासाठी फार महत्वाचे असेल तसेच हे अधिवेशन राजाभाऊ सरवदे यांच्या अध्यक्षपद निवडी नंतर पहिलेच मोठे अधिवेशन असल्यामुळे सोलापूर शहर जिल्ह्यातून अनेक कार्यकर्ते युवावर्ग मोठ्या संख्येने या अधिवेशनात सामील होण्यासाठी निघणार आहेत असे शहर अध्यक्ष अतुल नागटिळक यांनी सांगितले. या बैठकीस सरचिटणीस पवन थोरात,शाम धुरी,सुशील सरवदे राजेश उबाळे,अरुण भालेराव,सुमित शिवशरण,जयप्रकाश भंडारे तसेच शहर कार्यकरिणीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते...

# राज्यपाल रमेश बैस यांची किल्ले प्रतापगडास भेट

सातारा : राज्यपाल रमेश बैस यांनी किल्ले प्रतापगडास सहकुटुंब भेट दिली. यावेळी राज्यपालांचे प्रधान सचिव संतोष कुमार, विशेष कार्य अधिकारी महेश गोलाणी, अप्पर जिल्हाधिकारी तथा राज्यपालांचे परिवार प्रबंधक अरुण आनंदकर यांच्यासह किल्ले प्रतापगडावरील ग्रामस्थ उपस्थित होते.

राज्यपाल श्री बैस यांनी स्वतः पायी किल्ला चढून जाऊन गडावरील भवानी मातेचे दर्शन घेतले व सहकुटुंब देवीची पूजा केली. तसेच गडावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केले. यावेळी राज्यपाल श्री बैस यांनी किल्ल्याचा इतिहास जाणून घेतला. तसेच पंचायत समिती, शिक्षण विभाग, महाबळेश्वरच्या शिक्षकांनी अफजलखान वधाचा पोवाडा सादर केला.

**शिवकालीन खेडेगावास भेट**



राज्यपाल श्री. बैस यांनी वाडा कुंभरोशी येथील शिवकालीन खेडेगाव हस्तकला केंद्र, किल्ले प्रतापगड माची येथेही भेट दिली. शिवकालीन खेडेगाव येथे इतिहासाचे चांगले जतन केले आहे. या ठिकाणी पूर्वी लोकजीवन कसे होते हे पाहायला मिळाले. हा इतिहास भावी पिढीला पाहावयास मिळतो, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

# 'महानिर्मिती भुसावळ ६६० मेगावॅट प्रकल्प' ऑक्टोबरमध्ये कार्यान्वित करण्यासाठी मेसर्स भेल चे युद्धस्तरीय प्रयत्न



नवी दिल्ली : महानिर्मितीच्या भुसावळ ६६० मेगावॅट संच क्रमांक ६ चे अभियांत्रिकी, खरेदी आणि उभारणीचे काम केंद्र शासनाचा सार्वजनिक उपक्रम मेसर्स भेल (BHEL) कंपनी करीत असून या कामांना अधिक जलद गतीने पूर्णत्वाकडे नेण्यासाठी महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी.अनबलगन यांनी आज दिल्ली येथे भेल कंपनीचे सी.एम.डी. डॉ.नलिन सिंघल यांची भेट घेतली.महानिर्मितीच्या भुसावळ संचाचे बाष्पक प्रदीपन ३० मार्च २०२३ रोजी संपन्न झाले, त्यानंतर सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून हा संच माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये कार्यान्वित करण्यासाठी मेसर्स भेल चे युद्धस्तरीय प्रयत्न सुरू असल्याचे डॉ.नलिन सिंघल यांनी सांगितले.

मेसर्स भेल आणि महानिर्मिती अधिकाऱ्यांच्या संयुक्त बैठकीत भुसावळ वीज प्रकल्पाच्या विकास कामांचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. तसेच भविष्यातील वीज प्रकल्प, विद्युत उत्पादन क्षेत्रातील नवनवीन अत्याधुनिक तंत्रज्ञान, बदलते निकष, पर्यावरणीय ऱ्हास आणि घडामोडी या विषयांवर या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. यासंदर्भात मेसर्स भेल कंपनीने घेतलेल्या पुढाकाराबद्दल डॉ.पी.अनबलगन यांनी भेल कंपनीच्या अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

महानिर्मिती आणि मेसर्स भेल कंपनी यांचे मागील चार दशकांपासून असलेले सौहार्दपूर्ण संबंध लक्षात घेता आवश्यक ते संपूर्ण सहकार्य महानिर्मितीकडून भेल कंपनीला करण्यात येईल असे डॉ.पी.अनबलगन यांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या वीज क्षेत्राच्या दृष्टिकोनातून भुसावळ ६६० मेगावॅट हा अतिशय महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून यावर्षी राज्याच्या ग्रीडमध्ये ६६० मेगावॅटची भर पडणार आहे. भुसावळ मधील ६६० मेगावॅट क्षमतेचा पहिला आणि कोराडीच्या ३ संचांनंतर हा महानिर्मितीचा चौथा संच आहे.याप्रसंगी महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प), अभय हरणे, मरावीम सूत्रधारी कंपनीचे निवासी कार्यकारी संचालक प्रफुल्ल पाठक तसेच भेलचे वरिष्ठ अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यादरम्यान पुणे,साताराकडे जाणारे वाहतूक नियमन

सोलापूर/प्रतिनिधीः श्री क्षेत्र पंढरपूर आषाढीवारी २०२३ अंतर्गत श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा हा सातारा जिल्ह्यात दिनांक १८ जून रोजी प्रवेश करणार असून दिनांक दि. १८ ते २३ जून या कालावधीमध्ये सदरचा पालखी सोहळा हा सातारा जिल्ह्यातील लोणंद, फलटण शहर, फलटण ग्रामीण पोलीस या पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रातून मार्गक्रमण करणार आहे

. या पालखी सोहळ्यास सोलापूर ग्रामीण जिल्ह्याच्या दिशेने येणाऱ्या वाहनांचा अडथळा होवू नये, या करिता नातेपुतेकडून फलटण मार्गे पुण्याकडे जाणारी वाहतूक ही नातेपुते-दहिगांव-जांब-बारामती मार्गे पुण्याकडे व साताऱ्याकडे जाणारी वाहतूक ही शिंगणापूर तिकाटणे-दहिवडी मार्गे सातारा अशी वळवण्यात आली आहे.याबाबतचा जाहीरनामा पोलीस अधीक्षक (ग्रामीण) शिरीष सरदेशपांडे यांनी निर्गमित केला आहे. हा आदेश दिनांक १८ जूनच्या ००:०१ पासून दि. २३ जूनच्या मध्यरात्री २४ वाजेपर्यंत अंमलात राहील.

# पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी घेतली राज्यपाल रमेश बैस यांची सदिच्छा भेट

सातारा : पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी राज्यपाल रमेश बैस यांची महाबळेश्वर येथील राजभवनात सदिच्छा भेट घेतली.यावेळी पालकमंत्री श्री. देसाई यांनी मुख्यमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली महाबळेश्वर, पाचगणी, तापोळा येथे पर्यटन विकासासाठी सुरू असलेल्या विविध विकास कामांची माहिती दिली. तसेच जिल्ह्यातील आणि लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना दौलतनगर (मरळी), ता. पाटण परिसरात सुरू असलेल्या विकास कामांचीही माहिती दिली. यावेळी दौलतनगर येथील विकास कामांची पाहणी करण्यासाठी राज्यपाल श्री. बैस यांना निमंत्रण दिले. तसेच जिल्ह्यात सुरू असलेल्या शासन आपल्या दारी या उपक्रमातून २७ हजार लाभार्थ्यांना लाभ दिला असून राज्यातही शासन आपल्या दारीचा सातारा पॅटर्न राबविण्यात येत असल्याची माहिती पालकमंत्री श्री. देसाई यांनी यावेळी दिली.

